International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.3 Jan–Feb- 2022

# भारतीय निवडणूक आयोग आणि सुधारणा

**प्रा.विलासराव लवटे**
सहा.प्रा.राज्यशास्त्र विभाग,देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ
Email- vilasraolawate2020@gmail.com

**गोषवारा :-**

निवडणूक सुधारणा ही एक महत्वाची बाब आहे, जी निवडणूक प्रणालीमध्ये समाविष्ट होते. सामान्यत: मतदान प्रक्रिया सुधारण्यासाठी, मतदान प्रक्रिया अधिक पारदर्शकतेसाठी, निवडणूक प्रक्रियेत सुधारणा आवश्यक असतात.

**परिचय** - निवडणुका हा लोकशाही शासनाचा महत्वाचा भाग असतो. निवडणूक प्रक्रियेमध्ये गोंधळ निर्माण झाला तर लोकांचा संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडतो. अशाप्रकारे निवडणूका मुक्त आणि निष्पक्ष व्हाव्यात, यासाठी भारतीय राज्यघटना (अनुच्छेद 324) नुसार एक निवडणूक आयोग स्थापन केला आहे. त्यात मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर काही सदस्य असतात. त्यांची नियुक्ती भारताचे राष्ट्रपती करतात. त्यांच्या सेवा, अटी व शर्ती संसदेव्दारे निश्चित केल्या जातात. निवडणूक आयुक्ताचा सामान्य कार्यकाळ 6 वर्षाचा असतो. तथापि ते सर्वेच्च न्यायालयाचे न्यायाधीशांना ज्या पध्दतीने पदावरून दूर केले जाते, त्याच प्रक्रियेव्दारे निवडणूक आयुक्तांना पदावरुन दूर केले जाऊ शकते. संयुक्त राष्ट्रसंघ निष्पक्ष निवडणूक पार पाडण्यासाठी राष्ट्रीय निवडणूकांची आंतरराष्ट्रीय निरीक्षक प्रदान करतो.

**मतदारसंघ -**

**निवडणूक सुधारणांचा अर्थ आणि संकल्पना -**

निवडणूक कार्यपध्दतीतील बदलांशी संबंधीत सुधारणाबाबत सूचना केल्या जातात. निवडणूक आयोगाने सार्वत्रिक निवडणूकावरील आपल्या अहवालात प्रत्येक निवडणूकीनंतर महत्वाचे बलद समोर आणले आहेत. 1967 च्या चौथ्या सार्वत्रिक निवडणूकांपासूनच निवडणूक सुधारणांचा मुद्दा पुढे आला आहे. व तो राष्ट्रीय अजेंडा बनला आहे. निवडणूक गैरव्यवहाराच्या वाढत्या घटना देशात घडत आहेत, हे घडलेल्या काही उदाहरणांवरुन स्पष्ट होते. बूथ कॅप्चरिंग, मतपत्रिका हिसकावणे, लोकांना धमकावणे, शारीरिक बळाचा वापर करणे, मतदारांना प्रलोभने दाखवणे, सत्ता आणि पैशाचा वापर करणे इत्यादींचा वापर निवणूकीत सर्रास केला जातो. 1970 मध्ये निवडणूक झाली, त्यानंतर निवडणूक सुधारणांसाठी आयोगाने पुढाकार घेतला. यावेळी निवडणूक आयोगाने कायदा मंत्रालयाकडे सर्वसमावेशक प्रस्ताव पाठवला. प्रस्तावित सुधारणांना प्रभावी करण्यासाठी मसुदा विधेयक तयार केले. 1950 आणि 1951 ला हे विधेयक लोकप्रतिनिधी कायद्यात सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारने विधेयक तयार केले. मात्र हे विधेयक 1973 मध्ये लोकसभेत मांडण्यात आले, परंतू सरका बरखास्त झाल्याने हे विधेयक 1977 मध्ये लोकसभेत

रद्द झाले. जयप्रकाश नारायण यांनी निवडणूक सुधारणांसाठी प्रयत्न केले. सिटीझन्स फॉर डेमोक्रॉसी ही संस्था पारदर्शी निवडणूकांसाठी स्थापना झाली आहे. व्ही.एम. तारकुंडे, यांच्या अध्यक्षतेखाली एक समितीची स्थापना केली. त्या समितीचे अध्यक्ष व्ही. एम. तारकुंडे होते. सर्व प्रतिनिधींशी चर्चा करुन या समितीने 1975 मध्ये आपल्या शिफारशी मांडल्या. राजकीय पक्षांमध्ये निवडणूक सुधारणांबाबत आवश्यक एकमत तयार केले. नोव्हेंबर 1983 मध्ये निवडणूक आयोग आणि संवेदक राजकीय पक्षांमध्ये सुधारणांची गरज सलेल्या काही क्षेत्रांवर एकमत झाले, ते काही ज्या महत्वाच्या बाबींवर एकमत झाले.

**उदा.**

1. उमेदवारांसाठी वयमर्यादा कमी करणे.
2. एकापेक्षा जास्त मतदारसंघातून निवडणूक लढविण्यावर निर्बंध घालणे.
3. निवडणूकीसाठी राज्य निधी उपलब्ध करुन देणे.
4. उमेदवारी रद्द करण्यासाठी निवडणूक आयोगाला अधिकार देणे.
5. निवडणूक निरीक्षकांच्या अहवालाच्या आधारे निवड करणे.
6. निवडणूक आयोगास अधिक अधिकार देऊन सक्षम करणे.
7. भ्रष्ट व्यवहारांसाठी दोषी असलेल्या व्यक्तींची उमेदवारी रोखण्यासाठी आयोग निर्माण करणे.

**भारतातील निवडणूक सुधारणांसाठींचे मार्ग**

1. मतमोजणी प्रक्रिया
2. राजकीय पक्षांबद्दलचे नियम
3. निवडणूक कायद्यात बदल
4. मतदान करण्याच्या पात्रतेत बदल
5. नामांकन नियम आणि मतपत्रिका प्रवेश
6. निवडणूक मतदारसंघ आणि निवडणूक जिल्हा सीमा
7. मतपत्रिका डिझाइन आणि मतदान उपकरणे
8. उमेदवार, राजकीय पक्ष इत्यादीव्दारे निवडणूकीचे निरीक्षण
9. मतदार आणि निवडणूक कर्मचाऱ्यांची सुरक्षा
10. लाचखोरी, बळजबरी आणि हितसंबंधांच्या संघर्षांविरुध्द उपाययोजना
11. मतदारांची संख्या निश्चित करणे.

**निवडणूक आयोगास निवडणूक सुधारणांसाठी काही सूचना**

1. स्वतंत्र निवडणूक यंत्रणा निर्माण करणे.
2. प्रथम पास द पोस्ट म्हणजेच सिस्टीम प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन सिस्टीम बदलली पाहिजे.
3. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूका एकाच वेळी व्हाव्यात.
4. देशातील राजकीय पक्षांची संख्या मर्यादीत करण्याची गरज आहे.
5. गैर-गंभीर सदस्यांना निवडणूक लढण्यापासून परावृत्त करण्यासाठी सुरक्षा ठेव वाढवा.
6. उमेदवारांना एकाच मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची मुभा असावी.
7. राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखले पाहिजे.
8. मतदान खर्चाची मर्यादा आणि प्रचार कालावधी कमी करणे.
9. शारीरिक बळाचा वापर, पैसे आणि दारुचे वितरण तपासले पाहिजे.
10. नकारात्मक मतदान आणि लोकप्रतिनिधींना पदावरुन दूर करण्याच्या प्रणालीचा वापर केला पाहिजे.

11. मतदारांची नोंदणी आणि मतदान सक्तीचे केले पाहिजे.
12. राजकीय शिक्षण आणि निवडणूकीबाबत मतदारांमध्ये जागरुकता निर्माण करणे.
13. विधिमंडळाच्या सदस्यांसाठी कमाल वय आणि किमान पात्रता निश्चित करणे.

**भारतीय निवडणूक आयोगाची भूमिका -**

भारताच्या विधी आयोगाने आपला 255 वा निवडणूक सुधारणा शीर्षकाचा अहवाल मंत्रालयालात सादर केला. 261 पानांचा हा अहवाल सरकारच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून तयार करण्यात आला होता. जानेवारी 2013 मध्ये "निवडणूक सुधारणा" याविषयावर संपूर्णपणे विचार करुन काही बदल सुचविले होते. या कायद्यातील बदलांसाठी सर्वसमावेशक उपाय हे अतिशय प्रभावी आहेत, हे लक्षात आले. यातील शिफारसी विधी आयोगाच्या 244 व्या अहवालासोबत वाचणे आवश्यक आहे. 24 फेब्रुवारी 2014 रोजी न्यायालयाने प्रतिसाद म्हणून सादर केलेले निवडणूक अपात्रता शीर्षकाखाली 15 डिसेंबर 2013 रोजी न्यायालयाचा आदेश पारित झाला, कारण हे दोन अहवाल एकत्रितपणे सव्रसमावेशक आहेत. संपूर्ण निवडणूक प्रणालीचे मूल्यांकन आणि ते प्रतिसादात्मक कसे बनवायचे, हा प्रश्न आयोगापुढे होता. 244 व्या अहवालात दोन विशिष्ट मुद्यांचा समावेश आहे. त्यामध्ये राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि अपात्रता खोटे प्रमाणपत्र दाखल करणे. आता 255 व्या अहवालाच्या काही ठळक बाबीनुसार निवडणूक वित्त सुधारणा करणे आवश्यक आहे. आजच्या निवडणूकीच्या वित्तपुरवठयाचे वास्तव समजून घेणे महत्वाचे आहे. निवडणूक खर्च आणि राजकीय योगदानाची अपारदर्शकता या अहवालाखाली हे स्पष्टपणे जाणवते. कायद्यातील त्रुटी आणि काळा पैसा व खराब अंमलबजावणीमध्ये हे अपयश दडले आहे. सुधारणा आयोग हे विस्तृत आणि तपशीलवार शिफारसी करते. राजकीय वित्त, सार्वजनिक पर्यवेक्षण आणि तरतुदींची कठोर अंमलबजावणी आवश्यक असे, आयटी कायदे, कंपनी कायदे आणि इसीआय कायदे केले. लोकप्रतिनिधी कायदा, आयटी कायदा, आयकर कायदा आणि इसीआयचा कायदा यांचा संदर्भ निवडणूक कायद्यांशी आहे. दुसऱ्या सर्वात मोठया प्रकरणाचे शीर्षक आहे ते म्हणजे पेड न्यूज किंवा राजकीय जाहिरात. प्रच्छन्न् राजकीय जाहिराती लोकशाही निवडणूकांच्या प्रक्रियेत खोलवर वाढत आहेत. भारतात या पध्दतींवर खर्च होणारा पैसा घातांक पातळीवर वाढला आहे. पेड न्यूज आणि प्रच्छन्न् राजकीय जाहिरातींच्या अनैतिक प्रथा चिंताजनक पातळीवर पोहोचल्या आहेत. केवळ राष्ट्रीय माध्यमाच्या काही प्रकरणामध्येच नाही तर प्रादेशिक माध्यमांमध्ये देखील सशुल्क बातम्यांचे तीन प्रकार आहेत. त्यामध्ये बातम्या पारिभाषित करणे, सशुल्क बातम्या आणि राजकीय जाहिरात यांचा समावेश होतो. अहवालात ठळकपणे मांडलेली आणखी एक महत्वाची समस्या आणि तपशील दुसऱ्या मूळ प्रकरणात आहे. राजकीय पक्षांचे नियमन आणि अंतर्गत पक्ष लोकशाही हे आहे. अंतर्गत लोकशाही आणि पारदर्शकतेचा परिचय आर्थिक आणि निवडणूक उत्तरदायित्वाला चालना देण्यासाठी, भ्रष्टाचार कमी करण्यासाठी राजकीय पक्ष महत्वाचे आहेत तसेच संपूर्ण देशातील लोकशाही कार्यप्रणाली सुधारणे, यासाठी राजकीय पक्ष महत्वाचे आहेत.

**निष्कर्ष -** सरकारे सुचविलेल्या निवडणूक सुधारणांची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली तर सर्वसामान्यांचा लोकशाहीवरील विश्वास वाढेल. निवडूकांमध्ये गैर प्रकार घडणार नाहीत. लोकशाही मूल्यांचा विकास होण्यास ही मदत होईल.

**संदर्भ -**

1. बॅनर्जी ए.सी., द मेंकिंग ऑफ द इंडियन कॉन्स्टिटयूशन, 1939-1947 मुखर्जी आणि कंपनी, कलकत्ता, 1948, खंङ
2. दास एस.सी., भारतातचे संविधान, चैतन्य पब्लिशिंग हाऊस, अलाहाबाद, 1968.
3. गर्जेद्रगडकर पी.बी. - भारताचे संविधान.
4. कमल के.एल., भारतातील राजकीय पक्षाचे राजकारण, एस. चंद अँड कंपनी, दिल्ली, 1970 प्रेस बॉम्बे, 1969.



**प्रा.विलासराव लवटे**